## प्रकरण दुसरे :

# मराठी कादंबरी वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी कादंबरी स्थान


| | | |
|---|---|---|
| २.१. | प्रस्ताविक | पृ.६ |
| २.२. | कादंबरीचे स्वरुप व व्याख्या | पृ.६ ते पृ.११ |
| २.३. | मराठी कादंबरीचे वाटचाल | पृ.११ते पृ.१८ |
| २.४. | साठोत्तरी कादंबरीचे मराठी कादंबरीच्या वाटचालीतील स्थान | पृ.१९ ते पृ.२३ |
| २.५. | समारोप | पृ.२४. |
| २.६. | संदर्भ व टीपा | पृ.२५ ते पृ.२८ |

प्रकरण दुसरे :

# मराठी कादंबरी वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी कादंबरी स्थान

## २.१. प्रस्ताविक :

प्रस्तुत प्रबंधिकेच्या हया दुसऱ्या प्रकरणामध्ये मराठी कादंबरीची वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी कादंबरीचे स्थान याचा विचार करावयाचा आहे.

कादंबरीलेखनाची बीजे प्राचीन काळातील देशोदेर्शीच्या कादंबरी सदृश लेखनात सापडत असली, तरी एक वाङ्:मयप्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला रुपबंध ही बाब अर्वाचीन आहे. ही अर्वाचीन कादंबरी युरोपात उगम पावली, हे नाकराता येत नाही भारतीय कादंबरीने हयाच कादंबरीचा वारसा स्वीकारला. भारतात इंग्रजाचे राज्य दृढमूल झाल्यानंतर इंग्रजी विद्या व कला हयांचा प्रसार झाला, त्याचे हे अपरिहार्य फलित आहे. आता त्याची सविस्तर माहिती पाहू.

## २.२. कादंबरीचे स्वरुप व व्याख्या:

कादंबरीच्या मूळ स्वरुपाचा आणि उगमाचा प्रश्न आपणास देशोदेर्शीच्या प्राचीन कथापरंपरांकडे घेऊन जातो, हा भालचंद्र नेमाडे हयांचा विचार चिंतनीय आहे. तथापि सातव्या शतकालीत कादंबरी वा जगात इतरत्र आढळणारी तिच्या सारखी साहित्यरुपे आणि अर्वाचीन कादंबरी हयांची सांधेजोड सरधोपटपणे करता येईलच, असे नाही.

कादंबरीलेखनाची बीजे प्राचीन काळातील देशादेशीच्या कादंबरीसदृश लेखनात सापडत असली, तरी एक वाङ्:मयप्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला रुपबंध

ही बाब अर्वाचीन आहे. त्यासंदर्भात मीनाक्षी कुलकर्णी लिहितात, "एकोणिसाव्या शतकातील युरोपमध्ये 'कादंबरी' हया वाङ्:मयप्रकाराने आपले स्पष्ट, स्वतंत्र व्यक्तिमत्व धारण केले आहे, तेव्हा त्याचा घाट हा आधीपासुन अस्तित्वास असणाऱ्या महाकाव्य, अदभुतकथा व वीरकथ या कथनप्रकारांपेक्षा निश्चितपणे भिन्न होता". एकूणच, अर्वाचीन कादंबरी युरोपात उगम पावती, हे नाकारता येत नाही.

भारतीय कादंबरीने हयाच कादंबरीचा वारसा स्वीकारला आहे. भारतात इंग्रजांचे राज्य दृढमूल झाल्यानंतर इंग्रजी विद्या व कला हयांचा जो प्रसार झाला, त्याचे अपरिहार्य फलित आहे.

कादंबरीची व्याख्या करता येत नाही म्हणून तिचे स्वरुपविशेष डोळ्यासमोर असू नये, असे मात्र नाही. सामन्यपणे विषयवस्तू (Thame), कथानक (Plot), व्यक्तिरेखन (Characterization), सामाजिक वातावरण हया अर्थाने पाश्वभूमी (Seting), कादंबरीकाराचा दृष्टीकोन (Poine View), असे कादंबरीचे काही विशेष सांगता येतील.

कोणताही कादंबरीकार हा काही व्यक्तींची विशिष्ट सामाजिक वातावरणात घडलेली कथा सांगत असतो. म्हणजे कादंबरीकाराला कालपरिमान अपरिहार्यपणे अनुसरावे लागते. हयांचा अर्थ, हे कादंबरीचे अनिवार्य घटक आहेत आणि ते प्रत्येक कादंबरीत असतातच, असे नाही.

कादंबरी ही विशिष्ट व्यक्तींच्या संदर्भात विशिष्ट समाजवास्तवात व कालावकाशात घडणारी एक भाषिक घटनाच असते. म्हणून विशिष्ट कालावकाशात घडणारी घटनांची मालिका कादंबरीत उलगडत जाते.

हयावरुन मानवीमन, जीवन आणि त्याभोवतीचा समाज हयांच्या शोधासाठी कटिबध्द् असलेला 'कादंबरी' हा एक वैशिष्टपूर्ण वाङ्:मय प्रकार आहे. कादंबरी ही मानवी मनाचा व जीवनाचा एक वास्तवपूर्ण कलारुप वेध घेत असते. कादंबरी हे आपल्या काळाचे चित्र असते, हे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशयरुपाने येणे अपरिहार्य ठरते. व्यक्ती विशिष्ट सामाजिक वास्तवात जगत असते. व्यक्तींचे परस्परांशी जे संबंध येतात, त्यातच सामाजिकता असते. कारण व्यक्ती ही सामाजिक वास्तवाचा व समाजाचा घटक आहे (क्लरा रीव्ह).

थोडक्यात, 'कादंबरी' हा समाजनिष्ठ असा साहित्यप्रकार आहे. मानवी मन, जीवन आणि त्याभोवतीचा समाज हयांच्या प्रत्ययकारी चित्रणासाठी कादंबरी लिहिली जाते. आपल्या कादंबरीतून जे विश्व कादंबरीकार उभे करीत असतो त्याद्वारे त्याला आपली म्हणून काही विशिष्ट भूमिका स्पष्ट करावयाची असते.

सर्वसाधारणपणे पाहता, कोणत्याही साहित्यकृतीचा निर्मितीसंदर्भ साहित्यिकाचा वर्तमान हा असतो. त्याच्या भोवतालची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीच त्याला निर्मितीसाठी उपयुक्त ठरते/उद्युक्त करते, हया दृष्टीने कोणतीही साहित्यकृती ही तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक संदर्भाने परिवेष्टित असते. हा संदर्भ कधी अभावात्मकही असेल. उदा. ज्ञानेदेवांसारख्या एखादया व्यक्तीला एखादा समाज वाळीत टाकतो. त्याला समाजाला दुरावून जगावे लागते. त्या परिस्थितीचे परिणाम त्याच्या लेखनावर थोडफार तरी होतात.

'कादंबरी' हा प्रकार जरी आधुनिक असला, तरी त्याचे बीज फार पुरातन आहे, हे भालचंद्र नेमाडे हयांनी यथार्थरीतीने दाखवून दिले आहे.[१] प्राचीन भारतीय

परंपरेतही अगदी वेदांमधील कथांमध्ये व अद्‌भुत कथांमध्ये निसर्गविषयक अनुभव चित्रित केलेले आढळतात. लोकसाहित्यामध्येही कहाण्या, आख्याने अशी कथेची पूर्वरुपे आढळून येतात.

इंग्रजांच्या आगमनामुळे मराठी साहित्यिकांपुढील केवळ संस्कृत वाङ्‌मयापुरता मर्यादित असलेला आवाका विस्तृत झाला व त्यातून फारसी, तसेच इंग्रजीच्या संपर्कात मराठी साहित्यिक येऊन लहान-लहान गोष्टीबरोबर मराठी कादंबरी अस्तित्वात आली. गद्य हे पद्यापेक्षा आत्मप्रगटीकरणास सोपे असल्याने ‘कादंबरी’ हा आधुनिक साहित्यप्रकार रुढ झाला. फक्त १५० वर्षांचा कालखंड लाभलेली कादंबरी कमी कालावधीतच लोकप्रिय झाली, ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हा साहित्यप्रकार आपल्यासाठी उपरा नाही. ‘कादंबरी’ हा शब्द आपला आहे. पण कल्पना परकीय आहे.[२]

‘कादंबरी’ ह्या मूळ संस्कृत शब्दाचा कोशातील अर्थ मद्य (wine) असा आहे.[३] हे नाव मदयाची आस्वादयता आणि मोहक वाङ्‌मयप्रकार ह्या अर्थाने न देता बाणभट्टाच्या ‘कादंबरी’ ह्या ग्रंथावरुन दिले आहे.[४] ‘महाराष्ट्र भाषेचा कोश’ ह्या १८२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात ‘कादंबरी’ ह्या शब्दाचा ‘कल्पित कथा’ असा अर्थ दिलेला आहे.[५] ‘कादंबरी’ हा स्थळ, काळ, कलावंताचा दृष्टीकोन, अभिव्यक्ती इ. नुसार सतत परिवर्तन होत जाणारा वाङ्‌मय प्रकार आहे. म्हणून कादंबरीचे अद्यावत स्वरुप आणि तिची वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी वेगवेगळे कादंबरीकार, समीक्षक आणि विचारवंत ह्यांनी कादंबरीच्या स्वरुपाविषयी काय मत मांडले आहे, हे पाहणे आवश्यक

आहे. कादंबरीचे सर्वसमावेश रुप ध्यानात घेऊन एच्.जी. वेल्स हयांनी 'कादंबरी म्हणजे ज्यात सर्व काही सामावेल, अशी गारुडयाची थैली.'[६] अशी व्याख्या केली आहे.

उषा हस्तक हयांनी वेगवेगळया व्याख्यांमधून निर्देशित झालेली वैशिष्टये एकत्रितपणे सांगितली आहेत, ती अशी :[७]

१. कादंबरी हया वाङ्:मय प्रकारात कथनाला / निवेदनाला महत्त्व असते.

२. कादंबरीने व्यापलेल्या विषयाची वर्गवारी निश्चित करता येत नाही.

३. लघुकथाचा आणि लघुकादंबरी हयांच्यापेक्षा कादंबरीतील मानवी जीवनव्यवहारांचे दर्शन अधिक व्यापक स्वरुपात घडविता येते. कारण तिचा फलक त्यांच्याहून विस्तृत असतो.

४. घटना, व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाच्या विविधस्तरीय व्यामिश्र रुपांचे दर्शन कादंबरीला घडविता येते. त्यासाठी सामान्यत: स्थळ-काळाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो.

इ.स. १८७२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'नावल व नाटक' हया ग्रंथात का.बा. मराठे हयांनी सर्वप्रथम कादंबरीच्या वैशिष्टयांविषयी विचार मांडले. ते म्हणतात, "ज्यात आश्चर्यकारक गोष्टी फार व जो विचार वाचला असता अव्वलपासून अखेरपर्यंत वाचणाऱ्यास नवल वाटावे, असा ग्रंथ म्हणजे नावल."[८]

प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले कादंबरीची व्याख्या देताना म्हणतात, "सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक पात्रांची स्वभावचित्र व काही तद्‌वलंबित जीवित घटना यांचे गोष्टरुपाने वर्णन करुन व कातानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा गद्य् वाङ्:मय विभाग."[९]

मराठीतील आतापर्यंतच्या व्याख्यांपेक्षा भालचंद्र नेमाडे हयांनी दिलेली व्याख्या अधिक योग्य व परिपूर्ण आहे. ते म्हणतात, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेला अशी साहित्यकृती असते."[१०]

हया सर्व वैशिष्टयांमुळे एखादी मोठी कृती कादंबरीतून सहजतेने मांडता येते, एखादया संस्कृतीचे दर्शन घडवता येते, एखादया समस्येचा पाठपुरावा करुन विविध संदर्भासकट मांडता येतो, संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेता येतो, आशयसुत्रे बळकट करता येतात, पात्रे सलग उभी करता येतात. अशा प्रकारे भालचंद्र नेमाडयांच्या व्याख्येमुळे कादंबरीचे परिपूर्ण रुप आपल्या डोळयासमोर उभे राहते.

## २.३. मराठी कादंबरीची वाटचाल :

बाबा पद्मनजींच्या 'यमुनापर्यटन' (१८५७) हया कादंबरीचा उल्लेख मराठीतील पहिली स्वतंत्र व सामाजिक कादंबरी असा करण्यात येतो. हया कादंबरीत बाबा पद्मनजी हयांनी एकोणिसाव्या शतकातील सामाजिक प्रश्न, विशेषत: त्या काळातील ब्राम्हण विधवांचे दु:खद, कष्टप्रद जीवन, विधवाविवाहाच्या संदर्भात त्यावेळच्या समाजात निर्माण झालेल्या क्रियाप्रतिक्रिया हयांचे चित्रण केले आहे. हयातील नायिका यमुना ही आपल्या पतीबरोबर नवनवीन प्रदेशात प्रवास करते. थोडेफार शिक्षण झालेले असल्याने ती वैचारीक पातळीवरसुध्दा प्रवास करते अशा दोन वेगवेगळ्या स्तरांवर झालेल्या प्रवासाची ही कथा आहे. हयात एकोणिसाव्या शतकातील सामाजिक वास्तवाचे यथायोग्य

चित्रण करण्यात आले आहे. हया कादंबरीचे मोठेपण सांगताना गो.मा.पवार म्हणतात, "जीवनाशी सुसंगत वाटावी अशीच कथानकाची धाटणी, समाजाच्या विविध स्तरांवरील व्यक्ती आणि साधी, कृत्रिमतेचा अभाव असणारी भाषा ही चांगल्या कादंबरीची वैशिष्टये हया मराठीतील पहिल्या कादंबरीत आढळतात."[११]

'यमुनापर्यटन' नंतरचा काळ 'मुक्तामाला', 'मंजुघोषा' हया रंजनप्रधान कादंबऱ्यांचा होता. वाङ्:मयीन संकेतांना अनुसरणारी आणि प्राधान्याने रंजक असे आकृतिनिष्ठ पंडिती वळण असणारी हळब्यांची 'मुक्तामाला' आणि वास्तवापासुन पळवाट काढणारी गुंजीकरांची 'मोचनगड' अशा हया दोन कादंबऱ्याडोळ्यांसमोर ठेवून अनेक कादंबरीकांरानी कादंबऱ्या लिहिल्या. ही रंजक कादंबऱ्यांची परंपरा मोडण्याचे श्रेय हरिभाऊंच्या कादंबरीला दयावे लागेल.

अदभुत्रम्य कादंबरीचा पगडा मराठी कादंबरी वाङ्:मयावर फार काळ टिकू शकला नाही. १८५७ ला मुंबई विद्यापीठाची स्थापना होऊन त्यामधुन आंग्लविद्याविभूषित व्यक्ती तयार होऊ लागल्या. त्यामुळे मराठी वाङ्:मयाची इंग्रजी वाङ्:मयाशी तुलना होऊ लागली. त्यामुळे जाणिवेच्या कक्षा रुंदावल्या. राजाराणीच्या काल्पनिक गोष्टी लिहिण्याऐवजी सर्वसामान्य मनुष्याच्या जीवनात काय घडते, ते लिहिण्याची भावना जागृत होऊ लागली.

ह.ना. आपटे हयांच्या कादंबऱ्या नागर जीवनातील कौटुंबिक चित्र रेखाटणाऱ्या आणि सामाजिक समस्या मांडणाऱ्या आहेत. आपटयांनी एकंदर दहा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. हया कादंबऱ्यामधून त्यांनी पुणेरी जीवनाचे चित्र रेखाटले. शिवाय त्यांच्या कादंबरीत एकोणिसाव्या शतकाच्या समाजजीवनाची जिवंत चित्रे

आढळतात. 'मधली स्थिती' (१९८५) ही ह.ना. आपटयांची खऱ्या अर्थाने नागरीजीवन चित्रित करणारी पहिली कादंबरी, तिच्याबद्दल वा.ल. कुलकर्णी म्हणतात, "महाराष्ट्रातील वरिष्ठ मध्यमवर्गीय पांढरपेशांच्या एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या समाजजीवनाची हरिभाऊंच्या दृष्टीने ही 'मधली स्थिती' आहे."[१२] एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस किडलेला डोलारा कोसळू पाहणाऱ्या समाजाचे चित्र हयातून पहावयास मिळते. 'पण लक्षात कोण घेतो!' हया कादंबरीत एकत्र कुटुंबपध्दतीत व्यक्तीची होणारी कुचंबणा, स्त्रियांचा छळ हयांचे चित्रण येते. त्याचबरोबर हळूहळू विभक्त कुटुंबपध्दतीच्या चाहुलीचे पण चित्रण येते. त्याच बरोबर 'गणपतराव', 'मी', 'भयंकर दिव्य', 'मायेचा बाजार' हया कादंबऱ्यामधून एकत्र कुटुंबातील समस्या, तसेच पुनर्विवाहातील जोडप्यांच्या मुलीचा प्रश्न, स्त्रियांची कुचंबणा, विधवा स्त्रियांचे दु:ख, नवीन शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची मानसिक अवस्था हया सारख्या अनेक सामाजिक समस्या ह.ना. आपटे हयांनी मांडल्या आहेत. हरिभाऊंच्या कादंबरीवर 'सदाशिव पेठी कादंबरी' असा आक्षेप घेतला जातो. तरी सुध्दा हरिभाऊंची कादंबरी मोठीच ठरते. कारण त्यांच्या कादंबरीत पुणेरी नागरजीवनाचे चित्रण करणारी जी वर्णने येतात, त्यातून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पुण्यातील जीवनपध्दती, व्यक्तीचित्रणे हयावर चांगल्या तऱ्हेने प्रकाशझोत पडलेला आहे. शहरातील मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या हया अर्थाने हरिभाऊंची कादंबरी नागर ठरते.

वा.म. जोश्यांनी आपल्या भोवतालच्या पांढरपेशा मध्यमवर्गाचे वैचारिक विश्व, त्यातील मतमतांतरे, समस्या चित्रित केलेल्या आहेत. पांढरपेशाचे जग म्हणत असताना फक्त बुध्दिनिष्ठ उच्चशिक्षितांचे वैचारिक जगच झाले, असे म्हणावे लागते.

कारण वा.म. जोश्यांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्ती व समाज ह्यांच्या परस्पर आकलनाचे चित्र येत नाही. सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनात जी वादळे उठत होती, त्याचे बौध्दिक स्वरुपाचे केलेले चित्रण जोश्यांच्या कादंबरीमध्ये आहे . म्हणून त्यांच्या कादंबऱ्यामध्ये व्यक्ती एकत्र येतात आणि वेगवेगळ्या प्रश्नांवरती चर्चा करतात. समाजात निर्माण होणाऱ्या हया विचारप्रवाहांना व आदर्शांना जोश्यांनी ललित वाङ्:मयात पहिल्यांदा स्थान दिले. 'रागिणी', 'उत्तरा', हयांच्याद्वारे तत्कालीन नवसुशिक्षित स्त्रीवर्गाच्या इच्छा-आकांक्षाचे एक वेगळे चित्र वा.म. जोश्यांच्या कादंबरीतून जाणवते. 'रागिणी' बाबत गो.मा. पवार म्हणतात, "हया कादंबरीतील पाच-सहा पात्रे एकमेकांना भेटतात, तेवढेच त्यांचे जग. प्रत्येकाला काही विशिष्ट कुटुंब, नातीगोती, समाज, त्याचे प्रश्न वैगेरे काही नसते. त्यामुळे वा.म. जोश्यांनी मांडलेले प्रश्न जीवनातले, समाजातले न वाटता केवळ बौध्दिक वाटतात."[१३]

तत्त्वचिंतनात्मक कादंबऱ्यानंतर समाजशास्त्रीय कादंबऱ्यांचा उदय झाला. डॉ. श्री. व्यं. केतकरांनी समाजशास्त्रज्ञाच्या भूमिकेतून जे कादंबरीलेखन केलेले आहे, त्याचा परामर्श घेताना दुर्गा भागवत हयांनी केतकरांना सखोल समाजशास्त्रीय विचार कादंबरीच्या अनुभव विश्वात जिरवून व्यक्त केल्याबद्दल समर्थ कदंबरीकार, असे गौरविले आहे. समाजातील विविध प्रकारच्या सामाजिक समस्यांचे डोळस भान केतकरांच्या कादंबऱ्यांमधून प्रत्ययाला येते. त्याबद्दल विद्याधर पुंडलिक आपले मत व्यक्त करताना म्हणतात, "स्त्री-पुरुष संबंध, मिश्रविवाह इ. जे प्रश्न केतकरांनी आपल्या कादंबरीत चर्चेला घेतले ते सुध्दा मध्यमवर्गीयांच्याच चिंतेचे, चिंतनाचे आणि जिव्हाळ्याचे आहेत, हे लक्षात ठेवावयास हवे, अर्थात् हया प्रश्नांबाबत केतकरांचे विचार हे तत्कालीन

पांढरपेशा समाजाच्या संदर्भात अभिनव, धीट आणि त्यामुळे धक्का देणारे होते, यात शंका नाही. केतकरांचे श्रेय हे आहे आणि ते आपल्याला नाकारता येत नाही."[१४] डॉ. केतकरांनी 'गोंडवनातील प्रियवंदा' (१९१६ ते १९२६), 'परागंदा' (१९२६), 'आशावादी' (१९२७), 'गावसासू' (१९३०), 'ब्राम्हणकन्या' (१९३०), 'विचक्षणा' (१९३०) अशा काही कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ह्या सर्व कादंबऱ्यामागे केतकरांची समाजशास्त्रज्ञाचीच भूमिका आहे. सामाजिक जीवनात उद्भवणाऱ्या समस्यांचे भान केतकरांच्या कादंबरीत असलले दिसून यते.

हयानंतरची ना.सी. फडक्यांची कादंबरी अगदी वेगळ्या वळणाने मराठी कादंबरीच्या प्रवाहात उठून दिसते. एखादी हकीकत मनोरंजन रीतीने सांगण्यासाठीच फडके कादंबरीलेखन करताना दिसतात. फडक्यांची प्रत्येक कादंबरी म्हणजे एक प्रेमकथाच आहे. तरुण-तरुणी, एकमेकाबद्दलचे आकर्षण, योगायोग, प्रेम व प्रेमात बाधा, विरह, थोडा विरोध, शेवटी वैवाहिक जीवन किंवा असफलता, अशा पध्दतीच्या कादंबऱ्यामुळे प्रचलित जीवनमूल्यांना आव्हान देणारा नवा विचार फडके मांडताना दिसत नाहीत. फडके नायकांच्या सर्व बाबींचे वर्णन करतात. हयाबद्दल नरहर कुरुंदकर म्हणतात, "फडके त्यांच्या कादंबऱ्यांतून व्यक्तिमत्त्वे साकारत नाहीतच. फक्त त्यांच्या भाषेच्या सामर्थ्यामुळे डोळयांसमोर हालचाल करणाऱ्या चालत्या, बोलत्या, देखण्या, रंगीत चित्रविचित्र लकबीच्या बाहुल्याच उभ्या राहतात, व्यक्ती उभ्या राहतच नाहीत."[१५] हया नायक-नायिका वेगवेगळ्या परिस्थितीतून, क्षेत्रातून आलेल्या असल्या, तरी त्यांच्या जीवनातील प्रत्यक्ष संघर्ष फडके हेतुपुरस्सरपणे टाळतात. त्यामुळे व्यक्तीचे वास्तवरुप व व्यक्तीच्या मनाचा तळ त्यांना गाठता येत नाही. हयाबद्दल गो.मा. पवार म्हणतात,

"मानवी मनाचे काही एक अर्थपूर्ण चित्रण, दर्शन घडवण्यासाठी व्यक्तिरेखा निर्माण करण्याऐवजी साम्यविरोध तत्त्वांचा उपयोग करुन पात्रे निर्माण केली. त्यांच्या ठिकाणी मूलभूत मानवी मर्म अथवा गुंतागुंत दाखवण्याऐवजी त्यांना चेहरे, पोषाख, काही लकबी, ढोबळ स्वभाव विशेष तेवढे बहाल केले. वाचकांना चटकदार वाटतील, अशा प्रेमाच्या पेचात त्यांनी पात्रांना सोडले. त्यांच्यासाठी सदैव अनुकूल, आकर्षक पार्श्वभूमी तयार केली. सगळ्यांना संभाषण कौशल्याची देणगी देऊन टाकली. हे सगळे करताना पात्रे व त्यांचे सामाजिक वास्तव यांचा संबंध असणे अशक्यच."[१६] फडके आपल्या कादंबरीत ज्या कुटुंबाचे वर्णन करतात, त्यातील आवश्यक तेवढीच पात्रे घेतात. त्यांचे कोणाकोणाशी, कसे नातेसंबंध आहेत, ती ज्या प्रत्यक्ष समाजातून आलेली आहेत, त्याची परिस्थिती नेमकी कशी आहे, अशा नागरजीवनाचा प्रत्यय देण्यास फडके असमर्थ ठरतात. फडक्यांच्या कादंबरीबाबत कुसुमावती देशपांडे म्हणतात, "जीवनाच्या अनुभवातून खरे अपरिहार्य दु:ख बुध्दिपुरस्सर वगळून टाकणे, हा फडक्यांचा विशेष आहे . त्यामुळे त्यांची कादंबरी वस्तुविन्मुख व कृत्रिम झाली."[१७]

फडक्यांच्या नंतर वि.स. खांडेकर आदर्शवादी भूमिकेतून स्वप्नरंजनात्मक कादंबरी लिहिताना आढळतात. त्यांच्या कादंबरीत ध्येयवाद, देशसेवा, विषमतेचा प्रश्न, साम्यवाद, गांधीवादी विचारप्रणाली, तत्कालीन राजकारण असे विषय येतात. जीवनाच्या भाष्यकाराची भूमिकाही त्यांच्या कादंबरीतून डोकावते. आर्थिक, धार्मिक, राजनैतिक प्रश्न ते ध्येयवादी भूमिकेतून सोडविण्याचा प्रयत्न करतात, हे सगळे एका आलंकारिक व कृत्रिम भाषेत ते मांडतात. त्यांच्या लेखनात सुभाषितांची, पुराणकथेतील दाखल्यांची गर्दी जाणवते. त्यांच्या शैली बद्दल चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "खांडेकरांच्या शैलीत

चमत्कृतिपूर्ण वाक्यांची अतिषबाजी असते. विरोध उक्तीची चकमक असते. शब्द क्रीडेची रंगत असते. त्यामुळे त्यांचे लेखन लोकप्रिय होते. विरोधी भाव, प्रसंग, अनुभव एकमेकासमोर ठेवून वाचकांना प्रभावित करण्यात त्यांची कल्पना सुखावते, असे दिसते. परंतु त्यामुळे जीवनाची अनेकांगिता, संमिश्रता, जटिलपणा, गुंतागुत, वैविध्य हे निसटून जातात."[१८]

फडके-खांडेकरांबरोबरच ग.त्र्यं. माडखोलकर हयांच्याही कादंबऱ्यांचा विचार करावा लागतो. हयांचेसुध्दा कादंबरीलेखन पावलोपावली वास्तवापासून दूर जाताना आढळते. हयांच्या कादंबरीत शरीरवर्णन एकसुरी व एका साच्याची आहेत. वाचकांना जे हवे, ते निखळ स्वप्नरंजनही ते देऊ शकत नाहीत. पांडित्याचे प्रदर्शन करणाऱ्या चर्चा मात्र त्यांच्या कादंबरीत विपुल प्रमाणात येतात. आपल्या कादंबरीत स्त्रीचा (नागकन्या) मानसिक गुलामगिरीचा प्रश्नही हे मांडतात. परंतु स्त्रीचा माणूस म्हणून विचार कादंबरीत येत नाही. स्त्री-पुरुष संबंधांकडे ते स्वच्छ दृष्टीने, मोकळेपणाने पहात नाहीत, त्यांनी चित्रित केलेली स्त्री एकनिष्ठ, समर्पणशील, त्यागी अशा साच्याची असते. सभोवतालचे समाजचित्रण करण्यास ते असमर्थ ठरतात. नागरजीवनाचे चित्रण त्यांच्या कादंबरीत आढळत नाही. स्वप्नरंजन, प्रणयप्रधान, देहवर्णने हयात त्यांची कादंबरी गुंतून राहते.

हया सर्वांपेक्षा वेगळीवाट चोखाळणाऱ्या विभावरी शिरुरकर हयांनी वास्तववादी कादंबरीलेखन केले. चोर समजल्या गेलेल्या, एका विशिष्ट कुंपणात बंदिस्त झालेल्या मांग गारुडी समाजाचे चित्रण १९५० मध्ये 'बळी' हया कादंबरीत विभावरी शिरुरकर हयांनी केले आहे. खऱ्याखुऱ्या सामाजिकतेची प्रत्यय देताना 'बळी' कोठेही

कमी पडत नाही. कुसुमावती देशपांडे हयाबद्दल म्हणतात, "१९५० च्या आसपास दोन-तीन वर्षात मराठी कादंबरीत नवचैतन्य व नवी जाणीव दिसु लागली. हया जाणिवेच्या स्पष्ट आविष्कार ज्यात होता, त्यापैकी 'बळी' एक अग्रगण्य आहे."[१९]

चंद्रकांत बांदिवडेकर हयांच्यामते, "मध्यमवर्गीय मर्यादा ओलांडून व सदाशिवपेठी संस्कृतीकडे पाठ फिरवून त्या दमदार तळागाळातल्या जीवनात उतरल्या, 'बळी' ही मराठीतील मानबिंदू ठरावा, अशी कादंबरी."[२०] 'बळीं'च्या आशयाला वास्तवतेचे परिमाण लाभले आहे. हया नव्या वास्तवादी कादंबरीचे मोठेपण नेमाडे पुढील प्रमाणे सांगतात, "जेव्हा रंजक रीतिप्रधान प्रवृत्तीलाच कलात्मक कादंबरी समजले जाई, तेंव्हा विभावरी शिरुरकरांची 'बळी' (१९५०) पुढे येऊन वास्तववादीचे नवे पर्वच सुरु केले. मराठीतील वास्तववादीची दैन्यावस्था 'बळी' नंतर संपुष्टात येणे अपरिहार्य आहे. इतकी 'बळी' ऐतिहासिक महत्त्वाची कादंबरी आहे ... विभावरींनी जोपासलेल्या हया वास्तव परंपरेला जरा उशिरा १९६० नंतर अप्रतिम बहर आल्याचे आपण पाहतोय. 'बळी' भाषातंत्र काबूत ठेवून नीट वाट काढली आहे. लैगिकता हा नित्याचाच भाग असलेल्या जीवनवर झोत टाकूनही आशय रंजक होऊ दिला नाही, हे शास्त्रीय वस्तुनिष्ठ शिस्तीच्या सर्जकतेनेच शक्य होते. दलित साहित्य असूनही 'बळी' जातीय नाही, हाही एक आदर्श होता."[२१]

मराठी कादंबरीच्या जन्मापासून होत असलेली वास्तववादाची पीछेहाट संपल्याचे आज स्पष्ट दिसते. मराठी कादंबरीचे नवे आवर्तन १९६० च्या सुमारास सुरु झाले.

## २.४. साठोत्तरी कादंबरीचे मराठी कादंबरीच्या वाटचालीतील स्थान :

स्वातंत्र्यानंतर वाचकांचे करमणुकीचे साधन म्हणून साहित्याचे महत्त्व वाढले. रंजनप्रधान कादंबऱ्या व फडके-खांडेकरांच्या मार्गाने कथानक प्रधान लिहिल्या जाणाऱ्या कादंबऱ्या असे दोन प्रवाह वाहत असताना मराठी कादंबरीत १९६० नंतर नवे प्रवाह निर्माण झाले. वेगळे जग शोधणारी ही कादंबरी मराठी साहित्यात 'नवी कादंबरी' म्हणून ओळखली जाते.

स्वात्तंत्र्योत्तर काळात जो जनतेचा अपेक्षाभंग झाला, जे नवे नवे प्रश्न निर्माण झाले, ते मांडण्यासाठी नवकादंबरीकारांना कादंबरीच्या माध्यमातून नवे व्यासपीठ लाभले. शहरातील बकाल वस्त्यापासून ते खेडयातील गोठयापर्यंत तिचा प्रवास सुरु झाला. उपेक्षित वर्गाचे, जातीचे, समाजाचे दु:ख, आनंद कादंबरीतून झिरपू लागले. त्यातून जुन्या कादंबरीच्या मार्गापेक्षा वेगळया मार्गाने नवी कादंबरी झिरपू लागले. त्यातून जुन्या कादंबरीच्या मार्गापेक्षा अनुभवक्षेत्रही विस्तारले. सदाशिवपेठी वातावरणातून कादंबरी खुल्या विश्वात शिरली. बंगल्यापासून झोपडीपर्यंत कादंबरीचा प्रवास झाला. राजकारण, विज्ञान, बेकारी, शेती, अंधश्रध्दा, स्त्री समस्या, व्यभिचार, विवाहबाहय संबंध, भ्रष्टाचार, व्यसनाधिनता, शेती, उदयोग इ. नवनवी क्षेत्रे मराठी कादंबरीसाठी उघडी झाली.

१९६० नंतर प्रादेशिक कादंबऱ्या मोठया प्रमाणावर लिहिल्या गेल्या. त्यात आनंद यादव हयांची 'गोतावळा' (१९७१), तर रा.रं. बोराडे हयांची 'पाचोळा' (१९७१), त्याच बरोबर उध्दव ज. शेळके हयांची 'धग' (१९६३) हया कादंबऱ्यांनी स्वत:च्या प्रदेशाचा स्वतंत्र ठसा उमटवला.

१९६० पूर्वी ऐतिहासिक कादंबऱ्या मराठीत लिहिल्या गेल्या. परंतु त्यातून फक्त इतिहास मांडण्याचा प्रयत्न झाला. नवी ऐतिहासिक कादंबरी मात्र इतिहासात माणूस शोधण्याचा प्रयत्न करु लागली. हयात रणजित देसाई हयांची 'स्वामी', 'राधेय', 'श्रीमानयोगी', तर शिवाजी सावंत हयांची 'मृत्युंजय', 'छावा' हया कादंबऱ्यांचा समावेश होतो.

भालचंद्र नेमाडे हयांची 'कोसला' ही कादंबरी १९६३ साली प्रकाशित झाली आणि मराठी साहित्यात प्रचंड खळबळ माजली. तिने मराठी कादंबरीचा साचाच धुडकावून लावला. 'कोसला' मध्ये अनुभवाची भाषा आहे. अनुभवातील तिरकेपणा, भपंकपणा आणि व्यस्तता भाषेच्या पातळीवर हया कादंबरीने सामर्थ्याने पेलून धरला आहे. 'कोसला' ही पांडुरंग सांगवीकराच्या जीवनाची कहाणी आहे. अवतीभवतीचा समाज, कुटुंबव्यवस्था, शिक्षण, जगण्याचे व्यवहार हयातील विसंगती आणि भोंदूपणा, भकासपणा आणि भंकसपणा दर्शविण्याचे काम 'कोसला' हया कादंबरीने केले. 'कोसला'च्या प्रकाशनाबरोबर मराठी कादंबरीविश्वात एक नवे वास्तववादी जीवनदर्शन अवतरले. त्यातून नवी लेखनदिशा लाभली.

विभावरी शिरुरकर हयांच्या 'बळी'च्या यशामुळे अनेकांचे लक्ष नरकयातना भोगणाऱ्या तळागाळातील समाजाकडे गेले आणि त्यातूनच 'फकिरा', 'माकडीचा माळ' (अण्णा भाऊ साठे), 'चौंडके', 'भंडारभोग' (राजन गवस), 'चक्र' (जयवंती दळवी) हया कादंबऱ्या पुढे आल्या.

आता तर नवीन युग आले आहे. दबलेल्या, दडपलेल्या, ग्रासलेल्या लोकांना, कादंबरीकारांना जाग आली आहे. 'हया युगाचा मी साक्षीदार आहे' हया

भावनेने सर्व कादंबरीकार लिहू लागले आहेत. सर्वसामान्य माणूसच केंद्रबिंदू असून हयातूनच कसदार अशा कादंबऱ्यांची निर्मिती होईल अशी आशा आहे.

उध्दव ज. शेळके ('धग' १९६०), मनोहर तल्हार ('माणूस' १९६३), भाऊ पाध्ये ('वैतागवाडी','राडा','होमसिक ब्रिगेड'), मनोहर शहाणे ('दिवाचा शब्द १९७४), दीनानाथ मनोहर ('रोबो' १९७६) हे सर्व कादंबरीकार नवी जाणीव, नैतिकता आपल्या कादंबऱ्यांमध्ये मांडताना दिसतात. भालचंद्र नेमाडे हयांच्यामतानुसार, "रुढ प्रकृतिप्रधान व रीतिप्रधान प्रवृत्तीचा प्रस्तुत नैतिक कादंबरीशी मूल्यश्रेणीतच विरोध असल्यामुळे १९६० च्या सुमारास ही कादंबरी उपरीच म्हणून जन्मली. ज्या काळातील वाङ्:मयीन संस्कृती ही वर्तमानपत्री प्रसिध्दी, व्यासपीठमान्यता, साहित्य सम्मेलनाची हुल्लडबाजी,फालतू समीक्षकांचे कानून नसलले कलावादी,रुपवादी सिध्दांत, कॅलिडोस्कोप (अच्युत बर्वे १९७७) मध्ये दाखवलले अनैतिक साहित्यव्यवहार, प्रकृतिप्रधान व लैंगिक कादंबऱ्यांची चलती अशा निर्लज्ज धूळफेकीत भाबडया वाचकांची दिशाभूल करत होती, त्या काळात ही नवी कादंबरी स्फोटासारखी ठरली. त्यामुळे प्रस्थापित मराठी वाङ्:मयीन अभिरुचीला मुळापासून हादरे देणारी आणि केवळ आपल्या गुणवत्तेवर प्रबळ झालेली ही एकमेव प्रवृत्ती आहे. आपल्या भूमिकेचे भान संबंध पिढीला आहे, असे चित्र कदाचित तेराव्या शतकानंतर आताच दिसून येत आहे. हया वीस वर्षात पंडिती मराठी समीक्षेला आपले कानून तपासून पाहण्याची गरज हयाच कादंबरीने निर्माण केली. नवी नैतिक कादंबरी मराठी वाङ्:मयीन संस्कृतीचा संपूर्ण कायापालट अपेक्षिते. पुढच्या पिढीला नवा वाचकवर्ग लिहू लागल्याबरोबर हे सशक्तपणे जाणवू लागेल हयाची चिन्हे आजच दिसत आहेत.

अत्यंत तात्विक प्रखर मतप्रणालीही हया कादंबरीच्या आशयात बसू शकते, अशी वास्तवाची विशाल बैठक असल्यामुळे मराठी कादंबरीचे सगळे रीतिनिष्ठ संकेत कोलमडले. इतक्या जाणीवपुर्वक साहित्याचे भान कोणत्याही कादंबरीला नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या जगात स्वतंत्र देशाचे आपण जबाबदार नागरिक आहोत, ही भूमिका हयाच काळातील कादंबरीकारांनी प्रथम आणली, असे गो.मा. पवार व म.ह. हातकणंगलेकर म्हणतात. (मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप १९६० ते १९७५).

रिक्षवाले, कामगार, सैनिक, खेडवळ बायका, हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन हया पोटसमुहांनी वर्षानुवर्षे जोपासलेली न्यायबुध्दी, उदारमतवाद ही तत्वे आपल्या संस्कृतीचा मुलाधार होता आणि नेमकी हीच तत्त्वे पूर्वीच्या कादंबरीला माहीत नव्हती. कारण पूर्वीचे आशय हया लोकांमधून घेतलेले नव्हते. म्हणून आशयद्रव्याच्या मर्यादा / कादंबऱ्यांच्याही मर्यादा होऊन बसल्या.

हया कादंबऱ्यांची संरचना विस्तृत आणि शेवट खुले असतात. एकीचे तत्त्व दर्शनी नसून आंतरिक असते. व्यक्तिरेखांची संख्या अवास्तव नसते. भाषेचा विचार केला, तर ती जीवनातील प्रत्यक्ष बोलीच असल्याने वास्तवाचे खरे चित्रण आणि भावनिकता तयार होते. प्रमाणभाषेची परंपरा मोडून तऱ्हेतऱ्हेच्या बोलीभाषा आत्मविश्र्वासाने पुढे आल्या.

थोडक्यात, गो.मा. पवार व म.द. हातकणंगलेकर हयांच्या मते, “हया आवर्तनातल्या कादंबरीकारांनी पंडिती समीक्षेचा पायबंद घातला, वास्तववाद अंगीकारला, नवी आशयद्रव्ये निवडली, अ-वास्तवाद व्यक्तिवाद डावलून व्यक्ती व समाज यांच्यामधला दुवा वेधला, लौकिक व्यवहारातच सौंदर्य शोधण्याची तत्त्वे रुढ केली. नव्या सौंदर्यकल्पना शोधल्या, हे वर्तमान जग सोडून भूतकाळात किंवा अद्भुतात किंवा कल्पित

अ-वास्तवात जाण्याची गरज नसते, आहे त्या वास्तवातच सौंदर्य असू शकते, हे गेल्या वीस वर्षातल्या कादंबरीकारांनी प्रत्यक्ष सिध्द केले आहे. नव्या कादंबरीकाराने हेही सिध्द केले आहे की, कादंबरीकाराला नैतिकतेचा आणि कृतिप्रधानतेचा रंजनापेक्षा जास्त आधार लागतो. कारण कादंबरीला सांस्कृतिक मूल्यांचे रक्षण, संवर्धन आणि प्रसार करण्याची सांस्कृतिक भूमिकाही कलावंत हया नात्यानेच अपरिहार्यपणे करायची असते. मराठी कादंबऱ्याचे जनक आज विविध सामाजिक थरांतून आलेले, तीव्र संवेदनक्षमता असलेले आहेत. कादंबरीची संख्यात्मक, तसेच गुणात्मक वाढ झालेली दिसून येते. उदयाच्या संपूर्ण पिढीला ही कादंबरी आपली वाटेल, अशी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. मराठी कादंबरीला देशीपणा आलेला आहे. ही हया कालखंडातल्या कादंबरीची सर्वाधिक कमाई म्हणावी लागेल," हे हाकणंगलेकरांचे म्हणणे तंतोतंत खरे वाटते.

एकूण १९६० नंतरच्या कादंबरीचा विचार करता मराठी कादंबरीच्या वाटचालीमध्ये हया कादंबरीचे स्थान महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट होते.

## २.५. समारोप :

अशा प्रकारे कादंबरीलेखनाची बीजे प्राचीन काळातील देशोदेशींच्या कादंबरीसदृश लेखनात सापडत असली, तरी एक वाड्:मयप्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला रुपबंध ही बाब अर्वाचीन आहे.

भारतीय कादंबरीने अर्वाचीन कादंबरीचा वारसा स्वीकारला आहे. मराठीतील पहिली स्वतंत्र व सामाजिक कादंबरी म्हणून बाब पद्मनजीच्या 'यमुनापर्यटन' (१८५७) हया कादंबरीचा उल्लेख होतो. बाबा पद्मनजीच्या पासून १९६० पर्यंतचे कादंबरीची वाटचाल पाहिली. त्यामध्ये १९६० नंतर कादंबरीला अप्रतीम बहर आल्याचे आपण पाहतोय. कादंबरीचे एक नवे आवर्तन १९६० च्या सुमारास सुरु झाले. हया १९६० नंतरच्या कादंबरीकारांनी पंडितीसमीक्षेला पायबंद घातला, वास्तववाद अंगिकारला. असे आपल्याला दिसून येते.

## २.६. संदर्भ व टीपा :


१. पहा : नेमाडे भालचंद्र, 'आधुनिक मराठी कादंबरीतील वास्तवाच्या चित्रणाची तंत्रे व शैली,' वाङ्:मयीन शैली आणि तंत्र, संपा. हातगणंगलेकर म.द., अभिजात प्रकाशन, कोल्हापूर, १९८१, पृ.

२. पहा : बापट प्र.वा., व गोडबोले ना.वा., 'मराठी कादंबरी : तंत्र व विकास,' व्हीनस प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती : १९७३, पृ . . .

३. पहा : आपटे वा.शि., 'दि स्टुडन्टस् इंग्लिश डिक्शनरी,' मोतीलाल बनारशीदार, दिल्ली, व्दितीयावृत्ती : १९७०, पृ. . . . .

४. पहा : जोशी लक्ष्मणशास्त्री व इतर (संपादक), 'मराठी विश्वकोश,' खंड-३, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती : १९७६, पृ.५९९

५. पहा : जोशी लक्ष्मणशास्त्री व इतर (संपा.), तत्रैव, पृ-५९९

६. पहा : बापट प्र.वा. व गोडबोले ना. वा., उनि, पृ. ३७

७. पहा : हस्तक उषा, 'कादंबरी' अंतभूत : 'साहित्य अध्यापन आणि प्रकार,' वा.ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ, मौजे प्रकाशन व पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९८७, पृ.२५१.

८. मराठे का. बा., 'नावल व नाटक हयाविषयी निबंध,' मॉडर्न बुक डेपो प्रकाश, पुणे, प्रथमावृत्ती : १९६८, पृ.१

९. बापट प्र.वा., गोडबोले ना.वा., तत्रैव, पृ.३७

१०. नेमाडे भालचंद्र, 'आधुनिक मराठी कादंबरीतील वास्तवाच्या चित्रणाची तंत्रे व शैली' (लेख), अंतर्भूत : 'वाङ्:मयीन शैली आणि तंत्रे,' संपा. हातकणंगेलकर म.द. अभिजात प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती: १९८१, पृ.२४

११. पवार गो. मो., 'साहित्य मूल्य आणि अभिरुची', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती: १९९४, पृ.१४२

१२. कुलकर्णी वा.ल., 'हरिभाऊंची सामाजिक कादंबरी,' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : पृ.१८

| | | |
|---|---|---|
| १३. | पवार गो.मा., | तत्रैव, पृ-१४२ |
| १४. | पुंडलिक विद्याधर., | 'केतकरांच्या कादंबऱ्या,' मराठी कादंबरीची वाटचाल, संपा. कुलकर्णी पंडित, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, प्रथमावृत्ती : पृ. ९५-९६ |
| १५. | कुरुंदकर नरहर, | 'धार आणि काठ,' देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती : १९७२ |
| १६. | पवार गो.मा., | उनि., पृ. १४५-१४६ |
| १७. | देशपांडे कुसुमावती., | 'मराठी कादंबरी: पहिले शतक' (१८५०-१९५०), मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, प्रथमावृत्ती :१९७५, पृ.१८९ |
| १८. | बांदिवडेकर चंद्रकांत., | 'मराठी कादंबरीचा इतिहास,' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८९ |
| १९. | देशपांडे कुसुमावती., | उनि., पृ. |
| २०. | बांदिवडेवार चंद्रकांत., | 'मराठी कादंबरीचा इतिहास', उनि., पृ.६१ |

२१. नेमाडे भालचंद्र., 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती : १९९०. पृ. २१६-२१७